जा.क्र.नांवाशमनपा/निवड/925/2020
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक - 09/01/2020

::- <u>जाहिर सूचना</u> -::

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पोट निवडणुक - 2020

## अंतिम मतदार यादी /मतदान केंद्राची यादी प्रसिध्दी

ज्याअर्थी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 13-ड च्या पोट निवडणुक-2019-20 करीता राज्य निवडणुक आयोगाचे पत्र क्रं.रानिआ/मनपा/2019/प्रक्र13/का-5,दि.09 डिसेंबर 2019 च्या अनुषंगाने मतदार यादी तयार करणे व प्रसिध्द करणे बाबत कार्यक्रम निश्चित करुन दिलेला आहे.

त्याअर्थी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रं. 13 मधील जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतुदीनुसार 04.10.2019 रोजी अस्तित्वात असलेल्या 86 उत्तर नांदेड व 87 दक्षिण नांदेड विधान सभा मतदार संघाच्या मतदार यादीवरुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रं. 13-ड च्या पोट निवडणूकीसाठी तयार केलेली प्रारुप मतदार यादी जनतेच्या माहितीसाठी कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी मनपाच्या क्षेत्रिय कार्यालय क्रं. 05 इतवारा येथे प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करुन दिनांक 27.12.2019 ते दिनांक 03.01.2020 पर्यंत सुचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. **विहित मुदतीत प्राप्त झालेल्या सुचना व हरकतींचा विचार करुन, व प्रभागाच्या चतु:सिमेनूसार मतदार यादीची तपासणी करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 7-अ नुसार तयार करण्यात आलेली मतदार यादी अधिप्रमाणीत करण्यात आलेली आहे.** सदर अंतिम मतदार यादी व मतदान केंद्राची यादी नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. अंतिम मतदार यादी व मतदान केंद्राची यादी नागरीकांना पाहण्यासाठी मनपाच्या क्षेत्रिय कार्यालय क्रं. 05 इतवारा,महाराजा रणजितसिंघजी मार्केट,जूना मोंढा नांदेड येथे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच अंतिम मतदार यादी व मतदान केंद्राची यादी महापालिकेच्या संकेतस्थळ <u>www.nwcmc.gov.in</u> यावर उपलब्ध आहे.

दिनांक :- 11.01.2020

ठिकाण :- नांदेड.

आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.